## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक रानिआ-१०९७/प्र.क्र. १६३/९७/पंरा.
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ९ ऑक्टोबर, १९९७.

प्रति,
जिल्हाधिकारी,
उस्मानाबाद.

विषय.—ग्रामपंचायतींच्या निवडणुका—१९९७

संदर्भ.—आपलेकडील फॅक्स पत्र क्रमांक १९९७/जीबी/डेस्क-१/ ग्रापनि, दिनांक ४ ऑक्टोबर १९९७.

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपण उपस्थित केलेल्या मुद्द्यांबाबत त्यासमोर नमूद केल्यानुसार मार्गदर्शन देण्यात येत आहे :—

| मुद्दा | मार्गदर्शन |
|---|---|
| १. दिनांक २९ सप्टेंबर १९९७ पासून नामांकनपत्र भरण्याचे व स्वीकारण्याचे काम चालू आहे. परंतु, एका उमेदवाराला जास्तीत जास्त किती नामनिर्देशनपत्र भरता येतात याबाबत नियमात तरतूद नाही. | ग्रामपंचायत निवडणुकीसाठी एका उमेदवारास जास्तीत जास्त ४ नामनिर्देशपत्रे दाखल करता येतील. |
| २. एखाद्या उमेदवाराचे मतदार यादीतील वय २१ वर्ष आहे, परंतु सबळ पुराव्यासह आक्षेप सादर केल्यास व त्यात २१ वर्षांपेक्षा कमी वय आढळल्यास नामनिर्देशनपत्र नामंजूर करता येईल काय ? | मतदार यादीतील सर्व नोंदी ह्या निर्णायक (final) असतात व अशा नोंदींच्या बाबतीत आक्षेप घेता नाही. त्यासाठी लोकप्रतिनिधी अधिनियम, १९५१ च्या कलम २२ किंवा २३ खाली संबंधितांनी विहित केलेल्या पद्धतीनेच अर्ज करून अशा नोंदी दुरुस्त करून घेणे आवश्यक आहे. निवडणूक निर्णायक अधिकाऱ्यास ह्याबाबत चौकशी करून नोंदी दुरुस्त करण्याचा अधिकार नाही. (पहा—बी. एम. रामस्वामी वि. बी. एम. कृष्णमूर्ती, एआयूआर-१९६३, एस. सी. ४५८, रुपलाल मेहता वि. धनसिंग, एआयआर १९६८, पंजाब व हरयाणा ॲण्ड पीआर फ्रांसिस वि. राघवन पोझा, एआयआर १९८१, केईआर-६४) |
| ३. या जिल्ह्यास जवळपास १००० पितळी मुद्रांची आवश्यकता आहे. मागणी मा. आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे नोंदविली आहे. परंतु, अद्यापि पितळी मुद्रांचा पुरवठा झाला नाही, करिता स्थानिक रीत्या तयार करून घ्यावे किंवा कसे, | मा. आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडील मागणीचा पाठपुरावा करावा. तथापि, राज्यातील महानगरपालिकेच्या निवडणुका झालेल्या असून, महानगरपालिकांनी पितळी मुद्रा त्यांच्या आयुक्तांच्या ताब्यात ठेवलेल्या आहेत. नजिकच्या महानगरपालिकांच्या आयुक्तांना विनंती करून उसनवारीने पितळी मुद्रा तातडीने उपलब्ध करून घ्याव्यात. |
| ४. मतपत्रिका कोणत्या शासकीय मुद्रणालयाकडून छापून घ्याव्या याबाबत अद्यापि आदेश प्राप्त झालेले नाहीत. | राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्रमांक रानिआ. १०९७/प्र.क्र. १३७/९७/पंरा, दिनांक ८ ऑगस्ट, १९९७ मधील मुद्दा क्रमांक १५ मध्ये दर्शविलेल्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करावी. |

| मुद्दा | मार्गदर्शन |
| --- | --- |
| ५. मतदानअधिकारी/कर्मचारी यांना किती वेळा ट्रेनिंग द्यावे याबाबत खुलासा व्हावा कारण ट्रेनिंगचा भत्ता द्यावा लागतो. | सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचे दोन वेळा अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येते व ते पुरेसे होते, असा अनुभव आहे. वास्तविकत: या संदर्भात जिल्हाधिकारी यांनीच योग्य तो निर्णय घेणे आवश्यक आहे व त्यानुसार किती वेळा प्रशिक्षण देणे जरूरीचे आहे हे ठरवावे. |

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**(अपर्णा जोशी)**
अवर सचिव,
राज्य निवणूक आयोग, महाराष्ट्र.

प्रत–सर्व जिल्हाधिकारी यांना माहिती व योग्यत्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत.